| MHAH060004292026 | फौजदारी किरकोळ अर्ज नं. १११/२०२६ मधील निशाणी क्र.०१ खालील आदेश. संदिप पिराजी वेताळ वि. महाराष्ट्र शासन |
| --- | --- |

अर्जदार यांनी सदरचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता-२०२३ अंतर्गत कलम ५०३ महाराष्ट्र सरकार द्वारा तालुका पोलिस स्टेशन श्रीरामपूर यांनी गु.र.नं. ५५/२०२६ कलम 303(2) भारतीय न्याय संहिता-२०२३ व पर्यावरण संरक्षण अधिनियम १५ व ३ अन्वये जप्त केलेली टाटा मोटर्स कंपनीची Tipper/Dumper परत मिळणेकरीता दाखल केला आहे ज्याचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**अ.-** रजिस्ट्रेशन नं. – MH–12CT–8090
चेसीस नं. – 373135LUZ755137
इंजिन नं. – 697TC56LUZ907764
मॉडेल नं. – SK 1613094

२. अर्जदार यांचे असे म्हणणे आहे की, सदरचे वाहनाचे मुळ मालक सागर भाउसाहेब अमोलीक यांचे नावे आर.टी.ओ ला नोंदणीकृत असुन सदर ढंपर अर्जदार यांनी दिनांक ०७.०२.२०२६ रोजी करारनामा नोटरी दस्त क्र. ६७०/२०२६ अन्वये खरेदी घेतलेला आहे. सदर वाहन अर्जदार यांच्या दैनंदिन वापरातील असुन सदरचे वाहन त्यांचे घराचे बांधकामाची वाळु घेवुन जात असतांना पोलिसांनी खोटया गुन्हयात नदीतुन वाळु चोरली म्हणुन जप्त केलेला आहे. अर्जदाराने अशी कोणतीही वाळु चोरलेली नाही व पर्यावरणाचा -हास केलेला नाही.

३. सदर वाहन हे अर्जदाराचे उत्पन्नाचे साधन आहे. सदरचे वाहन हे पोलिस स्टेशनमध्ये पडून राहील्यास टायर, टयुब, बॅटरी व इतर स्पेअर पार्ट खराब होवून वापरणेस योग्य रहाणार नाही. त्यामुळे अर्जदाराचे अपरीमीत नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरचे वाहन बॉन्डवर परत मिळावे अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

अर्जदार यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे दाखल केली आहेतः-

| अ.क्र. | तपशील | निशाणी |
|---|---|---|
| १. | आर सी बुकची प्रत | निशाणी ३/१ |
| २. | करारनाम्याची प्रत | निशाणी ३/२ |
| ३. | गु.र.नं ५५/२०२६ ची प्रमाणीत प्रत. | निशाणी ३/३ |
| ४. | आधारकार्ड | निशाणी ३/४ |

**४.** तपासीक अंमलदार यांनी निशाणी क्र.६ येथे आपले म्हणणे सादर करुन असे कळविले आहे की, सदर गुन्हातील वाहन सोडल्यास पुन्हा त्या वाहनातून वाळु वाहतुकीसारखे गुन्हे करण्याची शक्यता आहे. मा. दंडाधिकारी साहेब श्रीरामपूर यांचे मार्फत वाहनावर कारवाई होणेबाबत पत्र देण्यात आले असुन कारवाई केलेबाबतचे पत्र अदयाप पावेतो आलेले नाही. त्यामुळे सदर केसचा निकाल लागेपर्यंत वाहन सोडु नये अशी विनंती केली आहे.

**५.** सहाय्यक सरकारी अभियोक्ता पी. आर धुमाळ यांनी सदर अर्जास आपले म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. त्यांचे असे कथन आहे की, सदरील वाहन कलम 303(2) भारतीय न्याय संहिता-२०२३ व पर्यावरण संरक्षण अधिनियम १५ व ३ अन्वये गुन्हयात जप्त करण्यात आलेले आहे. सदर वाहन हा अवैधरित्या वाळु वाहतुक करताना मिळुन आलेला असुन वाळुसह जप्त करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणामध्ये तपास होणे बाकी आहे. सदर वाळुची विल्हेवाट कशी लावली तसेच वाळु संबंधी अधिकार मा. तहसीलदार यांना असल्याकारणाने सदरचा मुद्देमाल सोडवणेकामी तहसिलदार यांचे म्हणणे मागविणे आवश्यक आहे. वाहनाचे स्वरुप बदलु शकते. प्रस्तुत गुन्हयात गाडीचा प्रत्यक्ष सहभाग दिसुन येत असल्याकारणाने सदर अर्ज नामंजुर करण्यात यावा.

६.		अर्ज व म्हणण्याचे अवलोकन करण्यात आले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

७.		तपासीक अंमलदार यांच्या म्हणण्यावरुन स्पष्ट होते की, सदरचे वाहन हे गु.र.नं. ५५/२०२६ कलम 303(2) भारतीय न्याय संहिता-२०२३ व पर्यावरण संरक्षण अधिनियम १५ व ३ अन्वये आहे. जप्त वाहनाचे आर.सी.बुक पाहिले असता त्यावर सागर भाउसाहेब अमोलीक यांचे नाव दिसुन येत आहे. परंतु आर.सी.बुक वर वाहनाचे नोंदणीकरण दिनांक १२.०१.२००६ चे दिसत आहे व मोटार वाहन कायदा १९८८ अन्वये तरतुदींप्रमाणे १५ वर्षे ही नोंदणी वैध्य असते त्यामुळे २०२१ ला नोंदणी संपुष्टात आली आहे व त्यानंतर फेब्रुवारी २०२६ मध्ये या वाहनाचे करारनामा करण्यात आला आहे. सदर बाब अर्जदाराच्या निदर्शनास आणली असता त्या संदर्भात त्यांना प्रादेशिक वाहन कार्यालय यांच्याकडे पत्र दिले असता त्यांनी वाहनाच्या तपशीलासह नोंदणीच्या नुतनीकरणासाठी अदयाप जप्त वाहनाचा अर्ज आलेला नाही असे कळविले आहे.

८.		जप्त वाहनाची नोंदणी संपुष्टात आलेली असल्यामुळे मोटारवाहन कायदा १९८८ चे तरतुदीं अन्वये जप्त वाहन जर विक्री करण्यात आले असेल तर त्याच्या नोंदणीसंदर्भात नुतनीकरण होणे आवश्यक आहे. अर्जदाराने सदर नुतनीकरणाबाबत तत्परता दर्शविलेली आहे व त्यासाठी जप्त वाहन नुतनीकरणासाठी लागणार आहे.

९.		जरी जप्त वाहनाचे नोंदणी संपुष्टात आली तरी एक जंगम मालमत्ता असल्यामुळे Sale of Good Act 1930 अंतर्गत अर्जदाराला झालेली विक्री वैध आहे. जरी मुळ मालक सागर अमोलिक यांचे म्हणणे प्रस्तुत प्रकरणात दाखल नसले तरी झालेल्या करारनाम्यातुन जप्त वाहनाची विक्री प्रथमदर्शनी वैध दिसत आहे. त्यामुळे जप्त वाहन अर्जदाराचे असल्याचे दिसुन येत आहे. जप्त वाहनाच्या मालकी संदर्भात कोणताही वाद नाही. तसेच सदर वाहनासाठी इतर कोणीही मागणी केली नाही.

१०.		मा. सर्वोच्च न्यायालय यांनी ***Sundharbhai Ambalal Desai V/s.***

State of Gujarat (Supra) reported in 2003 All MR (Cri.) 363 (SC) यांनी मुद्देमाल परतीबाबत आदेश करताना प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांना मार्गदर्शन सुचना घालून दिलेल्या आहेत. या मार्गदर्शन सुचनाप्रमाणे कोणताही मुद्देमाल १५ दिवस ते १ महिन्यापेक्षा जास्त कालावधीकरीता पोलिस स्टेशनमध्ये पडून राहता कामा नये त्याबाबत प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी योग्य ते आदेश केले पाहिजेत असे निर्देश दिले आहेत.

**११.** सदरचे वाहन पोलिस स्टेशनमध्ये जास्त दिवस पडून राहीलेस ऊन, वारा व पाऊस यामुळे या वाहनाचे नुकसान होवू शकते. अर्जदार यांच्या मालकीबाबत तपासीक अंमलदार अथवा सहाय्यक अभियोक्ता यांनी वाद उपस्थित केलेला आहे. अभियोग पक्षाने उपस्थित केलेल्या शंका की, जप्त वाहन अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास ते पुन्हा गुन्हयात वापरण्याची दाट शक्यता आहे, या शंकेचे निरसन अर्जदारास योग्य त्या अटी व शर्तीवर जप्त वाहन परत देण्यात येवू शकते. जप्त मुद्देमाल हे गुन्हयामध्ये सक्रीयरित्या वापरण्यात आले किंवा नाही हे खटल्या दरम्यान निश्चित होणार असून त्यामुळे, फक्त शंकेवर जप्त मुद्देमाल पडून खराब होण्यासाठी कोणतेही उपयुक्त कारण दिसत नाही. जप्त केलेले वाहन जर पुन्हा सोडण्यात आले तर त्याच्या मुळ स्वरुपात बदल करण्याचा अगर तबदील करण्याच्या शंकेचे निरसन अर्जदारावर योग्य त्या अटी घालुन व त्यांच्याकडून योग्य ते बंधपत्र घेऊन करण्यात येऊ शकते.

**१२.** भारतीय नागरीक सुरक्षा संहिता–२०२३ चे कलम ५०३ अंतर्गत जप्त मुददेमालाच्या संदर्भात नियमानुसार तपशील बनवायचे आहे. परंतु अजुन त्या संदर्भात नियम बनविण्यात आले नाही. तरीही जप्त मुददेमालाच्या तपशीलाबाबत अर्जामध्ये तसेच पंचनामा करताना दक्षता घेण्यात येत आहे.

**१३.** भारतीय नागरीक सुरक्षा संहिता–२०२३ चे कलम ५०३ अंतर्गत जप्त मुददेमालाचे छायाचित्रे किंवा व्हीडीओ काढणे आवश्यक आहे. सदर बाबींची पुर्तता अंतिम आदेशामध्ये करण्यात येत आहे.

**१४.** न्यायालयात सदर वाहन हे खटल्यादरम्यान ओळखीसाठी व पुराव्यासाठी गरज भासणार असून त्यामुळे अशा परिस्थितीत मा. सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्वे लक्षात घेऊन व अर्जदाराने दाखल केलेले न्यायनिवाडे Mani Vs The Revenue Divisional Officer and othersOn 14 June 2019 , M.Prakash Vs The Revenue Divisional Officer on 5 March 2019, Anil Yadav Vs The State Of Bihar & ors on 11 September 2015, M. Kamsala Vs The District Collector on 10 June 2019, प्रमाणे व सदर केसची एकुण परिस्थीती पाहता काही अटींवर अर्जदार यांना हे वाहन परत देणे न्यायोचीत होणार आहे म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**// आ दे श //**

| | |
|---|---|
| १ | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २ | गु.र.नं. ५५/२०२६ यामध्ये तालुका पोलिस स्टेशन श्रीरामपूर यांनी जप्त केलेले चारचाकी वाहन–<br>**अ.-** रजिस्ट्रेशन नं. – MH–12CT–8090<br>चेसीस नं. – 373135LUZ755137<br>इंजिन नं. – 697TC56LUZ907764<br>मॉडेल नं. – SK 1613094<br>रक्कम रु. **१०,००,०००/–** रक्कम रुपये (अक्षरी रुपये दहा लाख फक्त) चा सुपूर्दगीनामा न्यायालयाकडे करुन देणेच्या अटींवर व खालील शर्तीवर अर्जदार **संदिप पिराजी वेताळ** यांना त्यांच्या मागणीनुसार परत देण्यात यावी. |
| अ | अर्जदार यांनी सदर वाहन डंपरचा रंग अथवा बाह्य व अंतरीक स्वरुपात तसेच त्याचे महत्वाचे भाग या गुन्हयांचा निकाल होईपावेतो कोणताही बदल करणेचा नाही. अर्जदाराने प्रकरणाचा निकाल होईपर्यत पुरेपुर देखभाल करावी. |

| | |
|---|---|
| ब | अर्जदार यांनी आवश्यकता असेल तेंव्हा सदरचे वाहन न्यायालयात अथवा संबंधीत पोलिस स्टेशनमध्ये हजर करावे. |
| क | अर्जदार यांनी सदर गुन्ह्याचा निकालापावेतो हे वाहन कोणत्याही प्रकारे कोणासही विकू नये, तबदील करु नये तसेच त्याच्यावर कोणताही बोजा निर्माण करु नये. |
| ड | अर्जदार यांनी या वाहनाचे रंगीत फोटो विविध कोनातून जवळून घेतलेले दाखल करावेत व सदर फोटोवर अर्जदाराचे फेरसही घ्यावी. तसेच वाहनाचे व्हिडोओ काढुन दाखल करावे |
| इ | अर्जदार यांनी सदरच्या वाहनाचा वापर या गुन्ह्याचा निकालापावेतो इतर कोणत्याही अनुचीतरित्या किंवा गुन्हा होईल असा करणेचा नाही. |
| ३ | तपासीक अंमलदार यांनी सदर वाहन अर्जदार यांच्या ताब्यात देताना त्याचा रितसर पंचनामा करुन सदरचे वाहन सत्वर अर्जदार यांचे ताबेत द्यावे व तसा अहवाल या न्यायालयास सादर करावा याबाबतचे सुचनापत्र तपासीक अंमलदार यांना पाठविण्यात यावे. |
| ४ | जप्त वाहनाच्या नोंदणीसाठी अर्जदाराने त्वरीत पाउले उचलावीत व त्या संदर्भात कागदपत्रे तपासीअंमलदार यांच्याकडे सादर करावीत. अर्जदाराने याबाबतची नोंद घ्यावी की, ज्या जप्त वाहनाच्या नोंदणीचे नुतनीकरणासंदर्भात हालचाल केली नाही तर मुळ प्रकरणात जप्त वाहनाच्या संदर्भात योग्य ते आदेश करण्यात येतील. |

Digitally signed by VIJAYA NARAYANRAO KATKAR
Date: 2026.04.02 12:16:31 +0530

**ठिकाण – श्रीरामपूर.**

**दिनांक –०२.०४.२०२६**

**(काटकर विजया एन. एस.)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

**(न्यायालय क्र.४) श्रीरामपूर.**

## प्रमाणपत्र

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. निकालपत्र / आदेश या मधील सर्व मजकुर मुळ निकालपत्र / आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :- | क.अ. चितांबर |
| न्यायालयाचे नांव | :- | **काटकर विजया एन.एस.,**<br>४ थे दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),<br>तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीरामपूर. |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | :- | ०२.०४.२०२६ |
| न्यायिक अधिकाऱ्यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | :- | ०२.०४.२०२६ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | :- | ०२.०४.२०२६ |
| निकालपत्रावर डिजीटल स्वाक्षरी केलेचा दिनांक | :- | ०२.०४.२०२६ |

---------------------------